महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कार्यकारी संपादक : श्री. विजय यादव | jeevandeepvartanews2020@gmail.com | मुख्य संपादक : श्री. रविंद्र घोडविंदे | Rs.2/-

गुरुवार ❖ ०३ ऑक्टोबर २०२४ ❖ वर्ष ६ ❖ अंक १०० ❖ पाने - ४

RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024



१ली माळ : श्री शैलपुत्री

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी

# मा.ना.श्री. प्रमोद हिंदुराव

**उपाध्यक्ष : महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी**
**मा. अध्यक्ष : सिडको**



## अभिष्टचिंतन विशेषांक

-: सौजन्य :-
कृषि उत्पन्न बाजार समिती कल्याण



# अजितदादाची सावली बहुजनांची माऊली
# प्रमोद हिंदुराव

**रवींद्र घोडविंदे**

काही व्यक्तिमत्व नवनिर्मितीची कास धरून जीवन जगत असतात, त्यांची जगण्याची पद्धत हीच त्याची रीत बनते, हाती घेतलेली सामाजिक बांधिलकीच्या कामाची चळवळ बनवत तिच्या उद्देशाप्रतीची सफलता कृतीत आणत एक आदर्शवत उमदे नेतृत्व निर्माण होते. राष्ट्रवादी काँग्रेस चे प्रदेश उपाध्यक्ष प्रमोद हिंदुराव हे त्यापैकी एक नेतृत्व.

विदयार्थी दशेपासूनची संघटन शक्तीची उर्मी कायम जोपासत ऐन तारुण्यात बहुजन समाजाप्रतीच्या अन्यायाविरुद्ध बुलंद आवाज उठवत त्यासाठी वाटेल तो लढा देत संघर्षमय वाटेतून तरुणाचा आधारवड बनत उदयास आलेले हे नेतृत्व आज राज्याच्या राजकारणातील सक्रिय नेते गण म्हणून ओळखलं जात आहे. सामान्य माणूस विकासाचा केंद्र बिंदू मानत त्यांनी आपल्या सामाजिक कार्याला सुरवात केली त्यातूनच त्यांची राजकारणात एन्ट्री झाली आणि सिडकोचे अध्यक्ष पद तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष पद सांभाळत गेली. दोन दशक राज्याच्या राजकारणात ते आज सक्रियपणे काम करत आहेत.

प्रमोद हिंदुराव हे एक अभ्यासू, संयमी तसेच कणखर नेते म्हणून संपूर्ण राज्यात आज ओळखले जातात.स्पष्ट वक्ता ही त्यांच्या स्वभावाची खासियत सर्व परिचित आहे.कॉलेज जीवनात बिर्ला कॉलेज पासून यू आर, सी आर च्या निवडणुकातुन त्यांनी विद्यार्थी दशेपासून आपल्या नेतृत्वाची चुणूक दाखवत विद्यार्थी संघटनांमधून स्वतःच्या व्यक्तिमत्वाची जडण घडण केली.स्पष्ट परखड वक्ता, तितकेच वेळेचे भान ठेवून आपल्याला दिलेल्या जबाबदारीची जाणीव ठेवून काम करणारे प्रमोद हिंदुराव यांचा राजकीय प्रवास तसा संघर्षमयच कृषी क्षेत्राची आवड असल्याने त्यांनी कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निर्मितीपासून या समितीत काम करत शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य देत शेतकरी, व्यापारी, माथाडी या घटकासाठी भरीव कार्य केले. त्यानंतर ठाणे जिल्हा परिषदेत आपला बुलंद आवाज उठवत जिल्ह्यातील शेतकरी व अन्य घटकांच्या कल्याणासाठीच्या विकासाला प्राधान्य देत योगदान दिले. जिल्हा परिषदेत कृषी वा आरोग्य सभापती नंतर उपाध्यक्ष ही पदे भूषवत ठाणे जिल्ह्याच्या राजकारणात एक व्हिजनरी नेता म्हणून आपली नवी ओळख निर्माण केली. महाराष्ट्रातील जेष्ठ नेते आदरणीय शरद पवार यांची पुरोगामी विचारधारा मानत जिल्हा स्तरावरील हे नेतृत्व सन २०११च्या दरम्यान राज्याच्या राजकारणात सक्रिय झाले. त्याच वेळी सिडकोसारख्या संस्थेचे अध्यक्ष पद त्यांना मिळाले .राज्यस्तरीय प्रशासकीय सेवेच्या कामाची संधी मिळाली तीचं सोन करत त्यांनी आपल्या कामातून सिडको अध्यक्ष पदाचा बहुमान उंचावला. दरम्यानच्या काळात राज्याच्या राजकारणात मोठी उलथा पालथ झाली. अजितदादा पवार यांच्याशी जवळीक व तितकेच घनिष्ठ संबंध असणारे प्रमोद हिंदुराव त्यांच्या सोबत सावली सारखे सोबत करत होते. त्यांच्या सुख दुःखातील तेच खरे सोबती असले,तरी आदरणीय शरद पवारांविषयी त्यांची आदराची भावना कायम होतीच.

राजकारणात राहून अजातशत्रू ही आपली प्रतिमा जोपासण्याचे काम त्यांनी सातत्याने केले राजकारण फक्त वीस टक्के उर्वरित ऐंशी टक्के निखळ समाजकारण ही त्यांची तत्वप्रणाली त्यांच्या राजकीय जीवनाची खरी खासियत आहे. बहुजन समाजाच्या, विकासासाठीची त्यांची तळमळ त्यासाठीची धडपड कौतुकास्पद असते. सामाजिक बाधिलकीच्या भावनेतुन सर्व समाजाप्रतिच्या कल्याणासाठीची ओढ त्यासाठी राबविण्यात येणारे उपक्रम यामुळे प्रमोद हिंदुराव हे अबाल वृद्धाचे कैवारी असल्याची भावना आज ही कायम आहे. राज्याच्या राजकारणात ते सध्या सक्रिय आहेत. त्यांच्या कामाची पद्धत आणि अभ्यासू स्वभाव सतत वाचन करण्याची सवय पाहता या उमद्या अभ्यासू नेतृत्वाला राज्याच्या विधिमंडळातील सभागृहात आगामी काळात संधी मिळावी त्यांना त्यांच्या जन्मदिनाच्या निमित्ताने दैनिक ठाणे जीवनदीप परिवाराकडून मनःपूर्वक शुभेच्छा.

# प्रमोद हिंदुराव माझे राजकीय गुरु



डॉ. प्रमोद हिंदुराव यांनी
सन १९८१ मध्ये बिर्ला महाविद्यालयात शिक्षण घेत ह त्यांनी NSUI चे अध्यक्षपद भूषविले . या काळात त्यांनी विद्यार्थ्यांसाठी भरीव कामे केली.
सन १९८३ ते १९९१ मध्ये ते NSUI चे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष झाले. याच काळात त्यांच्यारूपाने तरुण नेतृत्व उदयास आले..
त्यांनी या कार्यकाळात विध्यार्थ्यांसाठी नवनिर्मितीचे उपक्रम राबवत स्वतःला सिद्ध केले. प्रमोद हिंदुराव हे नाव तेव्हापासून चर्चेत आले.



योग्य वेळी योग्य वेक्ती जीवनात आली तर जीवनाचं सार्थक होण्यास वेळ लागत नाही. माझ्या राजकीय जीवनाची सुरवात प्रमोद हिंदुराव यांच्या सानिध्यातुनच झाली, कल्याण कृषी उत्पन्न बाजार समिती नोकरीं तिथले निलंबणं आणि पुढे दादा हेच साहारा झाले त्यांच्या सतत च्या मार्गदर्शनामुळे मी राजकारणात आलो पुढे बाजार समितीत संचालक, सभापती, नंतर कल्याण पंचायत समितीत सदस्य, उपसभापती या सारखी पदे मिळाली आज राष्ट्रवादी काँग्रेस चा ठाणे जिल्हा ग्रामीण चे अध्यक्ष झालेला आहे. जिल्हा नियोजन समितीत सदस्य म्हणून काम करण्याची संधी त्यांच्यामुळेच मिळाली. प्रमोद हिंदुराव हे एक परीस आहेत त्यांच्या सानिध्यातुन अनेकांना विविध पदे मिळाली त्यांना वाढदिवसानिमित्त लाख लाख शुभेच्छा!

**- भरत ( भाऊ ) गोंधळी.**
**अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस( ठाणे ग्रामीण )**

महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कार्यकारी संपादक : श्री. विजय यादव | jeevandeepvartanews2020@gmail.com | मुख्य संपादक : श्री. रविंद्र घोडविंदे

गुरुवार ❖ ०३ ऑक्टोबर २०२४ ❖ वर्ष ६ ❖ अंक - १०० ❖ पाने - ४

RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024






# भाऊबीजेला दोन हफ्त्यांची ओवाळणी

## ऑक्टोबर महिन्यात जमा होणार नोव्हेंबरचा आगाऊ हफ्ता

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
□ **प्रतिनिधी**

विधानसभेची निवडणूक तोंडावर आल्यामुळे राज्यात अनेक राजकीय घडामोडी घडत आहेत. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांची जोरदार तयारी सुरु आहे. यातच सध्या अनेक नेत्यांचो राज्यभरात सभा आणि मेळावे सुरु आहेत. या मेळाव्याच्या माध्यमातून महायुतीचे नेते सरकारने राबववलेल्या योजनांची माहिती सांगत आहे. काही दिवसांपूर्वी महायुती सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना अंमलात आणली. या योजनेच्या माध्यमातून राज्यातील लाभार्थी महिलांना महिन्याला १५०० रुपये देण्यात येत आहेत. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी राज्यातील कोट्यवधी महिला पात्र ठरल्या आहेत. या योजनेचा लाभ मिळालेल्या महिलांना जुलै पासून महिन्याला १५०० रुपये देण्यास सुरुवात झाली.


राज्य सरकारने सर्वात आधी दोन महिन्यांचे एकत्र म्हणजे जुलै आणि ऑगस्ट महिन्यांचे मिळून महिलांच्या खात्यावर तीन हजार रुपये जमा केले होते. त्यानंतर पुन्हा सप्टेंबर महिन्याचे पैसे महिलांच्या खात्यावर जमा करण्यात येत आहेत. अशातच आता उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी लाडक्या बहि?णींना अजून एक मोठी खुशखबर दिली आहे. लाडक्या बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांना आता ऑक्टोबर आणि नोव्हेंबर असे दोन महिन्यांचे पैसे खात्यावर जमा होणार असून नोव्हेंबर महिन्यांचे पैसे देखील ऑक्टोबरमध्येच म्हणजे दिवाळीलाच जमा होणार आहेत, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली आहे.

'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतील लाभार्थी महिलांना आधी दोन महिन्यांचे तीन हजार दिले. त्यानंतर आता लाडक्या बहि?णींना सप्टेंबर महिन्याचे पैसे दिले आहेत. मात्र, आज मी तुम्हाला सांगतो ऑक्टोबर आणि नोव्हेंबरचे लाडकी बहीण योजनेचे पैसे १० ऑक्टोबरच्या आधी दिवाळी भाऊबीजेची ओवाळणी बहि?णींच्या खात्यावर जमा होणार आहे, हा शब्द मी तुम्हाला देतो', असं अजित पवार यांनी एका सभेत बोलताना म्हटलं आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज एका सभेला संबोधित करताना सांगितलं की, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे ऑक्टोबर आणि नोव्हेंबरचे लाडकी बहीण योजनेचे पैसे १० ऑक्टोबरच्या आधी म्हणजे भाऊबीजेलाच बहि?णींच्या खात्यावर जमा होणार आहेत, असं अजित पवारांनी सांगितलं आहे.

# ४६ गावांत विकासाची 'समृद्धी'

## भिवंडी तालुक्यातील समृद्धी महामार्गालगतच्या गावांचा एमएसआरडीसी विकास करणार



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुंबई :** मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गालगत भिवंडी तालुक्यातील ४६ गावांचा विकास आता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या (एमएसआरडीसी) माध्यमातून केला जाणार आहे. आमणे, आतकोली, भादाणे, भोईरगावसह ४६ गावांसाठी एमएसआरडीसीची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

७०१ किमी समृद्धी महामार्गाचा नागपूर ते इगतपुरी हा ६२५ किमीचा टप्पा सेवेत दाखल झाला आहे. येत्या काही महिन्यांत इगतपुरी ते आमणे हा उर्वरित ७५ किमीचा टप्पाही वाहतुकीसाठी खुला होईल. महामार्गालगतच्या गावांमध्ये विकासाची संधी निर्माण झाली असून त्यासाठी एमएसआरडीसीने १८ कृषी समृध्द नवनगरे विकसित करण्याचा निर्णय घेतला आहे. या दृष्टीने नियोजन सुरू असताना भिवंडी तालुक्यातील ४६ गावांच्या सर्वांगिण विकासाची संपूर्ण जबाबदारी सरकारने एमएसआरडीसीकडे सोपविली आहे. ४६ गावांसाठी एमएसआरडीसीची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्याचा शासन निर्णय सोमवारी प्रसिद्ध करण्यात आला. यापूर्वी सहा गावांसाठी एमएसआरडीसीची नवनगर प्राधिकरण म्हणून नियुक्ती झाली होती. नवनगर प्राधिकरण म्हणून काम करताना एमएसआरडीसीला

भूसंपादन करीत विकास साधणे आवश्यक होते. ही अडचणीची बाब लक्षात घेता एमएसआरडीसीने ४६ गावांसाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्याचा प्रस्ताव ठेवला होता. त्याच वेळी एमएसआरडीसीची सहा गावांसाठीची नवनगर प्राधिकरण म्हणून नियुक्ती रद्द करतानाच भिवंडीतील काही गावांच्या औद्योगिक विकासासाठीची एमआयडीसीची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

एमआयडीसीची विशेष प्राधिकरण म्हणून नियुक्ती रद्द करत त्या जागी एमएसआरडीसीची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. एमआयडीसीची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून असलेली ही नियुक्ती ही आता शासन निर्णयानुसार रद्द झाली आहे. त्यामुळे आता भिवंडी तालुक्यातील समृद्धी महामार्गालगतच्या ४६ गावांचा विकास एमएसआरडीसी कडून साधला जाणार आहे.

# शहापूर बाजार समिती पुरस्कृत पुरस्कार सोहळा वादातीत

## पुरस्कारातून डावलल्याने शहापूरातील शेतकरी नाराज

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
□ **प्रतिनिधी**



शहापूर कृषी उत्पन्न बाजार समितीने पहिल्यांदाच आयोजित केलेल्या प्रगतशील शेतकरी पुरस्काराला वादाची झाळ बसली आहे. तालुक्यातील काही प्रयोगशील शेतकऱ्यांना पुरस्कारातून डावलल्याने त्यांनी निवड समितीवर नाराजी व्यक्त केली आहे. शहापूर कृषी उत्पन्न बाजार समितीने वार्षिक सर्वसाधारण सभेचे औचित्य साधून शहापूर तालुक्यातील ५४ शेतकऱ्यांना यंदा पहिल्यांदाच प्रगतशील शेतकरी पुरस्काराने सन्मानित केले आहे. उत्कृष्ट हमाल एक, उत्कृष्ट कर्मचारी एक, विशेष सत्कार एक आणि उत्कृष्ट व्यापारी ११ असे एकूण ६८ पुरस्कार वितरित केले. शहापूर येथे हा कार्यक्रम गुरुवारी (ता. २६) झाल्यानंतर अनेक प्रयोगशील शेतकऱ्यांनी त्या?वर दहा वर्षांपासून सेंद्रिय पद्धतीने शेती करत आहे. दरवर्षी शेतीत नावीन्यपूर्ण प्रयोगाद्वारे भातपीक, भाजीपाला याचे भरघोस उत्पादन घेतो. याची वेळोवेळी वृत्तपत्रांनीही दखल घेतली आहे. शेतीसारख्या क्षेत्रात गलिच्छ राजकारण चालते याची खंत वाटते. - गुरुनाथ उबाळे, प्रयोगशील शेतकरी, किन्हवली

पुरस्कारासाठी निकषानुसार निवड करण्याची जबाबदारी स्थानिक संचालकांची होती. त्यांच्याकडून शिफारस आली असती, तर नक्कीच विचार केला असता. नंदलाल डोहळे, सभापती, शहापूर कृषी उत्पन्न बाजार समिती नाराजी व्यक्त केली. अनेक वर्षांपासून आपल्या शेतीत आधुनिक यंत्रसामुग्रीद्वारे संकरीत व सुधारित वाण वापरून भातपिके व भाजीपाला आदी नगदी पिके घेणे, डबघाईस आलेल्या शेती व्यवसायाला चालना देणे, शेतीत वेगवेगळे प्रयोग करून वेळ, श्रम व पैसा वाचविणे आणि शेतकऱ्यांपुढे नवा आदर्श निर्माण करणे, असे उल्लेखनीय कार्य केलेले प्रयोगशील शेतकरी पुरस्कारापासून वंचित राहिले आहेत. त्यांनी शहापूर कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक मंडळ व पुरस्कार निवड मंडळावर नाराजी व्यक्त केली आहे. स्थानिक संचालकांनी आपल्या मर्जीतील शेतकऱ्यांची पुरस्कारासाठी निवड केल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. तालुक्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील एकाही शेतकऱ्याची निवड न केल्याने प्रचंड नाराजी व्यक्त केली आहे. पुरस्कार वितरण समारंभाला काही ग्रामपंचायत सदस्यांनाही निमंत्रण नसल्याने हा पुरस्कार सोहळा कृषी उत्पन्न बाजार समितीला डोकेदुखी ठरला आहे.

# श्रमजीवी संघटनेच्या आंदोलनाची यशस्वी सांगता

## जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते ९०५ वन हक्क दावेदारांना वनपट्ट्यांचे वाटप

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
□ **प्रतिनिधी**



**ठाणे, दि.२ :** ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर गेले १३ दिवस सुरू असलेले श्रमजीवी संघटनेचे आंदोलन आज स्थगित करण्यात आले. ठाणे तालुक्यातील तब्बल ९०५ आदिवासी बांधवांना जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या हस्ते वन हक्क दावे प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. आपल्या वन अधिकारासाठी सलग १३ दिवस आंदोलन करणाऱ्या आदिवासी बांधवांच्या वेदनांची आम्हाला तीव्र जाणीव असून, शासन आणि प्रशासन आदिवासी बांधवांबाबत निश्चितपणे संवेदनशील आहे. काही तांत्रिक बाबींच्या प्रतिक्षेत दावे रखडले, असे जिल्हाधिकारी शिनगारे यांनी आज येथे सांगितले.

तर या आंदोलनादरम्यान आदिवासी बांधवांना त्यांचे न्याय्य हक्क मिळवून देण्यासाठी महसूल, आदिवासी विकास , नगरविकास, वन विभाग,पोलीस असे सर्व शासकीय विभाग तळमळीने काम करीत असल्याचे दिसून आले.असेच एकत्रित काम करणारे शासन जनतेला अभिप्रेत असल्याचे सांगत सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांचे श्रमजीवी संघटनेचे संस्थापक तथा राज्यस्तरीय अनुसूचित क्षेत्र आढावा समिती अध्यक्ष (मंत्री दर्जा) विवेक भाऊ पंडित यांनी भरभरून कौतुक केले.

एकही चुकीचा दावा पात्र नको आणि एकही पात्र होणारा दावा अपात्र होवून कुणावर अन्यायही नको, अशी भूमिका विवेक पंडित यांनी आधीच स्पष्ट केली होती. त्याप्रमाणे पूर्ण तपासणीअंती ९०५ दावेदार पात्र करून त्यांना वन पट्टे वाटप करण्यात आले, काही कागदपत्रांच्या पूर्ततेसाठी ५०१ दावे प्रलंबित ठेवण्यात आले आहेत. त्यांच्या पूर्ततेची पूर्ण संधी आदिवासी वन हक्क दावेदाराला मिळावी, या भूमिकेतून प्रशासन त्या दाव्याबाबत देखील कालबध्द पद्धतीने निपटारा करण्याची सकारात्मक भूमिका घेणार असल्याचे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी स्पष्ट केले. यावेळी श्रमजीवी संघटना संस्थापक तथा राज्यस्तरीय अनुसूचित क्षेत्र आढावा समिती अध्यक्ष (मंत्री दर्जा) विवेक भाऊ पंडित, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) हरिश्चंद्र पाटील, ठाणे उपविभागीय अधिकारी उर्मिला पाटील, आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी राजेंद्रकुमार हिवाळे, सहायक प्रकल्प अधिकारी तेजस्विनी गलांडे, नायब तहसिलदार राहुल सूर्यवंशी तसेच श्रमजीवी संघटनेचे दत्तात्रेय कोळेकर, बाळाराम भोईर, अशोक सापटे, प्रमोद पवार, राजेश चन्ने, दशरथ भालके, आत्माराम वाघे, नंदा वाघे, बाळू वाघे आदि पदाधिकारी उपस्थित होते.

# जिल्ह्यातील ४३१ ग्रामपंचायतींमध्ये स्वच्छ भारत दिवस साजरा



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त २ ऑक्टोबर २०२४ रोजी जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत स्वच्छ भारत दिवस साजरा करण्यात आला. भिवंडी तालुक्यातील तळवली या ग्रामपंचायतीमध्ये संत गाडगेबाबांच्या व महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस प्रकल्प संचालक अतुल पारस्कर, पंचायत समिती भिवंडीचे गटविकास अधिकारी गोविंद खामकर, ग्रामपंचायतीच्या सरपंच यांच्या शुभहस्ते पुष्पहार घालून कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी स्वच्छतेची शपथ घेण्यात आली, ग्रामपंचायती मध्ये वृक्षारोपण करण्यात आले. 'स्वच्छ भारत दिवस' या दिनाचे औचित्य साधून तळवली ग्रामपंचायत मधील नवीन सार्वजनिक शौचालयाचे उद्घाटन करण्यात आले.

जिल्ह्यातील सर्व गावांमध्ये ग्रामस्थांनी स्वच्छता प्रतिज्ञा घेतली. समारोप कार्यक्रम आज, २ ऑक्टोबर रोजी प्रत्येक गावात स्वच्छ भारत दिवस म्हणून मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला असून स्वच्छ माझे अंगण स्पर्धेत सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या कुटुंबांना सन्मानित करण्यात आले. या मोहिम अंतर्गत ४३१ ग्रामपंचायत अंतर्गत श्रमदानाच्या माध्यमातून जिल्ह्यातील प्रमुख ठिकाणी जसे सार्वजनिक स्थळे, धार्मिक स्थळे, बाजारपेठा, नद्यांचे किनारे, रस्ते आणि पर्यटन स्थळांची स्वच्छता करण्यात आली. या श्रमदान उपक्रमात स्थानिक नागरिकांसह एनएसएस, एनसीसी विद्यार्थी, स्वयंसेवी संस्था, विविध मंडळे आणि शासकीय कर्मचारी यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

तालुका आणि जिल्हास्तरावर स्वच्छतेशी संबंधित विविध उपक्रम राबवण्यात आले असून १७ सप्टेंबर ते १ आक्टोंबर या कालावधीमध्ये दर दिवशी गाव स्तरावर स्वच्छतेचे विविध उपक्रम राबवले आहेत. मोहिमेत 'सफाई मित्र सुरक्षा शिबिर' आयोजित करून सफाई मित्रांसाठी एक खिडकी योजनेद्वारे विविध सरकारी योजनांचा लाभ मिळवून देण्यात आले.

गावागावात एक झाड आईच्या नावे उपक्रमांतर्गत वृक्षारोपण करण्यात आले. स्वच्छता मोहिमेच्या अनुषंगाने एकल प्लास्टिकविरोधी अभियान राबवले असून, लोकांना प्लास्टिकचा वापर कमी करण्याबाबत जनजागृती करण्यात आली

## राष्ट्रीय समुहगान प्रतियोगिता स्पर्धेत कल्याण पूर्व विभागात
# सिध्दार्थ विद्या मंदिर तृतीय




**दै.ठाणे जीवनदीप वार्ता / (प्रतिनिधी) -**

कल्याण : भारत विकास परिषद, कल्याण पूर्व यांच्या माध्यमातून कल्याण पूर्व मधील विविध शाळांमधील विद्यार्थी व शिक्षक यांच्या सहभागातून मंगळवारी आंतरशालेय समूहगान स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. कल्याण पूर्वचे अध्यक्ष हेमंत दरगोडे यांच्या नियोजनाखाली स्पर्धा संपन्न झाली. या स्पर्धेमध्ये हिंदी, संस्कृत आणि देशभक्तीपर गीत गायन स्पर्धा घेण्यात आली. यात विद्यार्थी सहायता प्रतिष्ठानच्या सिद्धार्थ विद्या मंदिर कल्याण पूर्व शाळेने तृतीय क्रमांक पटकावला. संस्थेच्या सचिव शुभा गुप्ते, शाळेच्या मुख्याध्यापिका कल्पना शेवाळे यांच्या मार्गदर्शना खाली शर्मिला साळुंखे, अशोक काठे, सुनिता वंजारी, रामदास चौरे यांनी मेहनत घेतली तसेच सर्व शिक्षकवृंद, पालक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. या विद्यार्थ्यांनी तृतीय क्रमांक पटकाविल्याबद्दल त्यांचे शाळेच्या वतीने हार्दिक अभिनंदन करण्यात आले.

# नागरी समस्या सोडविण्यासाठी आमदारकीची उमेदवारी देण्याची नोवेल साळवे यांची मागणी

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता / (प्रतिनिधी) -**



महाविकास आघाडीतून कल्याण पश्चिमची जागा राष्ट्रवादी शरद पवार गटाला सोडण्याची मागणी

कल्याण : आगामी विधानसभा निवडणुकीत कल्याण पश्चिम विधानसभेची जागा महाविकास आघाडीच्या माध्यमातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाला सोडण्याची आणि आमदारकीसाठी उमेदवारी देण्याची मागणी महाराष्ट्र प्रदेश माजी सचिव नोवेल साळवे यांनी केली आहे. आज कल्याण पश्चिमेतील शासकीय विश्रामगृह नोवेल साळवे यांनी एक पत्रकार परिषद घेऊन आपली भूमिका मांडली. कल्याण पश्चिम विधानसभा मतदारसंघ तसेच संपूर्ण कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात राहणाऱ्या नागरिकांच्या समस्या दिवसेंदिवस वाढत चाल ल्या असून वाहतूक पोलिसांच्या हलगर्जीपणा आणि दुर्लक्षामुळे नागरिकांना विनाकारण वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. येथील लोकसंख्या वाढत आहे परंतु स्थानिक प्रशासनावर लोकप्रतिनिधी नसल्याने आजपर्यंत नागरिकांना ज्या सुविधा मिळाव्यात, त्या सुविधा मिळू शकल्या नाहीत.

कल्याणमध्ये ज्या सुविधा मिळाव्यात त्या सर्वच अपुऱ्या आहेत. महापालिकेने रुक्मिणीबाई रुग्णालयात मोफत आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या, मात्र या रुग्णालयाचे खासगीकरण करण्यात आल्याचे दिसत आहे.

या तालुक्यात सुविधा उपलब्ध करून देणारे महाविद्यालय आणण्याची साळवे यांची इच्छा आहे. दरवर्षी गणपती बाप्पाच्या आगमनावेळी रस्त्यांची दुरवस्था होते आणि जनतेच्या कष्टाचा पैसा दरवर्षी प्रशासन व लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून खर्च केला जातो. पण रस्ते तेच आहेत त्यांची सुधारणा होणे गरजेचे आहे मात्र ते झाले नाही. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, शरदचंद्र पवार पक्ष आणि येथील जनतेने महाविकास आघाडीच्या माध्यमातून संधी दिल्यास येथील रस्त्यांवर कधीही खड्डे पडणार नाहीत.

पाण्याची समस्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. पाण्याच्या समस्येवर मात करण्यासाठी नजीकच्या नदीचा वापर करता येईल. कल्याण पश्चिम शहरांमध्ये महापालिकेच्या व इतर अडचणीमुळे सर्वसामान्य नागरिकांना होणाऱ्या त्रासाबाबत व आपली निवडणूक लढण्याची इच्छा साळवे यांनी जाहीर केली आहे.

# १ली माळ : श्री शैलपुत्री



*नवरात्रीच्या पहिल्या दिवशी देवी शैलीपुत्रीची पूजा केली जाते. हिमालयाला संकित भाषेत शैल असे म्हटले जाते. अशातच देवी हिमालयात निवास करत असल्याने तिला शैलीपुत्री असे नाव पडले. देवी शैलीपुत्रीला वृषोरुढा, सती, हेमवती, उमा अशा नावांनीही ओखळले जाते. देवी शैलीपुत्रीच्या कृपेमुळे व्यक्तीमध्ये तपस्याचे गुण निर्माण होतात.देवी शैलीपुत्रीचे वर्णन करायचे झाल्यास तिचे रुप शुभ्र रंगातील आहे. देवीने श्वेत रंगाचे वस्त्रही धारण केले आहेत. देवीचे वाहन बैल आहे. देवी शैलीपुत्रीच्या डाव्या हातात त्रिशूळ आणि उजव्या हातात कमळ आहे. देवीचे हे रुप सौम्यता, करुणा, स्नेह आणि धैर्याचे दर्शन घडवून आणते.*

# आमदार किसन कथोरेंच्या हस्ते मृत कुटुंबियांच्या नातलगांना शासकीय धनादेशाचे वाटप !

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता / (प्रतिनिधी) -**



मुरबाड : मुरबाड तालुक्यातील मौजे खेवारे महाज येथिल कै. दिनेश माया जाधव यांचा दि.२५/०७/२०२४ रोजी शहापूर तालुक्यातील शेंद्रुण येथे कामा निमित्ताने गेला असताना नैसर्गिक विज पडून मृत्यू झाला होता. तसेच दि.२४/०९/२०२४ रात्री ८ वा. मौजे शिरगाव येथील कै.परसु कांता पवार याचाही विज पडून मृत्यू पावले होते. या दोन्ही मृत व्यक्तींचा शासकीय मदतीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्याल याला पाठवण्याचे आदेश तहसिलदार मुरबाड यांना आमदार कथोरे यांनी दिले होते.

हे प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाने तातडीने मंजुर करून आज प्रत्येकी चार लाख रुपयांचे धनादेश त्यांच्या कुटुंबियांना आज मुरबाड यथे आमदार किसन कथोरेंच्या हस्ते देण्यात आले. यावेळी नायब तहसिलदार अमोल शिंदे, नितिन मोहपे, अनिल घरत, सचिन चौधरी, आर.पी.आयचे दिनेश उघडे, जयवंत कराळे, मनोज देसले उपस्थित होते.

## उत्तम धर्मप्रसार कार्यासाठी
# गुजरातच्या मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सनातन संस्थेचा सन्मान



कल्याण : 'समन्वय परिवार गुजरात' यांच्या वतीने 'पूर्व शंकराचार्य श्री भारतमाता मंदिर, हरिद्वार'चे द्वितीय संस्थापक ब्रह्मलीन पद्मश्री स्वामी श्री सत्यमित्रानंद गिरीजी महाराज यांच्या ९३ व्या जयंतीनिमित्त नुकताच प.पू. वाल्मीकि संत संमेलन आयोजित करण्यात आले होते. या संमेलनात उत्तम धर्मप्रसार कार्यासाठी सनातन संस्थेचा सन्मान भाजपशासित गुजरात राज्याचे मुख्यमंत्री भूपेंद्रभाई पटेल यांच्या हस्ते करण्यात आला. मुख्यमंत्र्यांनी सनातन संस्थेचे गुजरात येथील साधक चंद्रशेखर कद्रेकर यांचा शाल आणि प्रमाणपत्र देऊन सन्मान केला.

या संमेलनात अध्यात्म, धर्म आणि राष्ट्र यांच्या आधारे देशसेवा करणाऱ्या सेवाभावी संस्थांचा सन्मान करण्यात आला, तसेच राष्ट्र-धर्माच्या संदर्भात संत आणि अतिथी यांनी मार्गदर्शन केले. संमेलनाचा आरंभ संत आणि मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून आणि श्लोक म्हणून झाला. त्यानंतर गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्रभाई पटेल यांच्या हस्ते राष्ट्र आणि धर्म यांसाठी समर्पित भावने कार्य करणाऱ्या संस्थांचा सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेले गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्रभाई पटेल म्हणाले, "साधु-संतांच्या सनातन विचारांनीच धर्मचेतना जागृत होईल आणि राष्ट्र निर्माणाचे कार्य होईल. संतांच्या आशीर्वादाने धर्मशक्ती निर्माण होऊन भारत विकसित देश होईल."

बालयोगी महाराज यांनी मार्गदर्शन करतांना सांगितले, "आध्यात्मिक शक्तीमुळे देशाची उन्नती होईल आणि भारत विश्वगुरूपद प्राप्त करेल; म्हणून आपल्याला धर्मासह राष्ट्रसेवाही करायला हवी." या प्रसंगी बालयोगी उमेश नाथजी महाराज (पीठाधीश्वर श्री क्षेत्र वाल्मीकि धाम, उज्जैन आणि राज्यसभा सभासद), श्री निखिलेश्वरानंदजी महाराज (अध्यक्ष, श्री रामकृष्ण आश्रम, राजकोट), डॉ. जयंतीभाई भादेशिया (रा.स्व. संघ), आश्विनभाई जानी (गायत्री परिवार), आमदार दर्शनाबेन वाघेला, तसेच 'वाल्मीकि समाज गुजरात'च्या १६१ संतांची उपस्थिती होती.

## मुंबई विद्यापीठाच्या ५७ व्या युवा महोत्सवातील
# नाट्यसंगीत या स्पर्धेच्या अंतिम फेरीमध्ये जीवनदीप महाविद्यालय गोवेलीचे यश







**दै.ठाणे जीवनदीप वार्ता / (प्रतिनिधी) -**

दि. २३ सप्टेंबर २०२४ रोजी विद्यापीठ विद्यार्थी भवन, मुंबई विद्यापीठ, चर्चगेट, मुंबई येथे मुंबई विद्यापीठाच्या ५७ व्या युवा महोत्सवातील नाट्यसंगीत या स्पर्धेची अंतिम फेरी पार पडली.. या स्पर्धेमध्ये आपल्या महाविद्यालयातील कु. नेहा केणे - SYBA हिने Consolation क्रमांक प्राप्त केला. या वेळी संगीत शिक्षक श्री. गणेश केमारे सर आणि श्री. कमलेश रोहणे सर उपस्थित होते. या प्रसंगी जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. रविंद्र घोडविंदे सर संचालक श्री. प्रशांत घोडविंदे सर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. बी. कोरे उपप्राचार्य प्रा. हरेंद्र सोष्टे सर तसेच सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. महेश थोरात, प्रा. विजय सोनार, प्रा. अपर्णा जाधव आणि सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी यांनी कौतूक आणि अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# शाळांमधील ड्रग्स, मादक पदार्थांना 'प्रहारी गट' घालणार आळा

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता / (प्रतिनिधी) -**

ठाणे : मादक द्रव्यांच्या आहारी गेलेल्या अथवा जाऊ शकतील अशा मुलांवर लक्ष ठेवण्यासाठी, शैक्षणिक संस्थेच्या परिसरातील मादक द्रव्य तस्करीस आळा घालण्याची जबाबदारी सोपविण्यासाठी व विद्यार्थ्यांचे समुपदेशन करून त्यांना परावृत्त करून शैक्षणिक संस्था मधील मादक द्रव्यांमुळे मानवी जीवनाच्या होणाऱ्या शोषणाबाबत जागरूकता आणण्यासाठी शाळांमध्ये प्रहारी गटाची निर्मिती करण्यात आली आहे. या प्रहारी गटामध्ये सर्व माध्यमाच्या, व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये या गटाची अंमलबजावणी केली जाईल. यामध्ये सहावी ते बारावी वर्गातील एकूण २० ते २५ मुलांचा समावेश करण्यात येणार आहे. याची दक्षता घेण्याचे काम संबंधित अधिकाऱ्यांनी करावयाचे आहे. या क्लबमधील सदस्य मादक द्रव्य हाताळणी व सेवन याबाबत संशयित विद्यार्थ्यांवर लक्ष ठेवतील आणि याबाबतची गोपनीय माहिती क्लबमध्ये नियुक्त केलेल्या शिक्षकांना देतील. त्यामुळे शालेय परिसरामध्ये होत असलेल्या अंमली पदार्थाचे सेवनास प्रहारी गटामुळे आळा बसणार आहे.

या प्रहारी क्लब मधील विद्यार्थी सदस्यांना गांधीजींचे तत्वज्ञान, विचार आणि मादक द्रव्यांचे दुष्परिणाम याबाबत मार्गदर्शन करतील. मादक द्रव्य प्रतिबंधात्मक कारवाई मध्ये पालकांची भूमिका महत्त्वाची असून शाळा व्यवस्थापन समितीने त्यांच्या बैठकीमध्ये तसेच पालक शिक्षक संघाच्या बैठकीमध्ये या विषयावर चर्चा करून जागरूकता केली जाईल. तंबाखू मुक्त शिक्षण संस्था या उपक्रमामध्ये तंबाखू सेवन प्रतिबंधासाठी देण्यात आलेल्या सूचनांची

**सर्व माध्यमाच्या, व्यवस्थापनाच्या अनुदानित, अंशतः अनुदानित शाळांमध्ये अंमली पदार्थांचे तस्करीस आळा घालण्यासाठी प्रहारी गटाची स्थापना करण्यात आलेली आहे. या गटाच्या माध्यमातून शालेय परिसरामध्ये अंमली पदार्थाच्या सेवनास प्रतिबंध घातले जाणार आहेत. शालेय स्तरावर प्रहारी गटाची स्थापना करणे बंधनकारक आहे. या गटातील विद्यार्थी व शिक्षकांना समुपदेशन सुद्धा केले जाणार आहे.**
**- ललिता दहितुले, शिक्षणाधिकारी (प्राथ./माध्य.) जिल्हा परिषद ठाणे**

शैक्षणिक संस्थेच्या आवारामध्ये अंमलबजावणी करण्यात यावी. शैक्षणिक संस्थेच्या आवारात १०० मीटर परिसरात तंबाखू व इतर मादक द्रव्य तसेच मध्य विक्री प्रतिबंध घातला जाईल, याची दक्षता घेण्यात येणार आहे. या प्रहरी गटाचे कामकाजाची माहिती विवरणपत्र प्रत्येक चार माहिन्यांनी सादर करणे शाळांना बंधनकारक राहणार आहे. इको क्लब, सांस्कृतिक क्लब, राष्ट्रीय सेवा योजना, भारत स्काऊट अँड गाईड, अशा कृती गटामार्फत कार्यक्रम घेऊन विद्यार्थ्यांना प्रेरित करावे लागणार आहे. प्रहारी क्लब ची स्थापना प्रत्यक्षात कार्यान्वित यशस्विता करून विविध जनजागृती कार्यक्रमाचे छायाचित्र, यशस्वी घटनांच्या बाबतीची माहिती संकलित करून वरिष्ठ कार्यालयास वेळोवेळी देण्यात येणाऱ्या विवरणपत्रात प्रत्येक चार माहिन्यांनी सादर करणे शाळांना बंधनकारक राहणार आहे.

बालकांमध्ये ड्रग्स आणि मादक पदार्थांचा प्रसार आणि अवैध तस्करी प्रतिबंध या विषयावर एक संयुक्त कृती आराखड्याच्या अंमलबजावणी साठी अनुपालन अधिकारी यांच्या नियुक्ती करण्यात आली आहेत.

सर्वसाधारणपणे शाळा स्तरावरील विद्यार्थ्यांकडून मादक पदार्थांचे सेवन केल्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढत असल्याचे निदर्शनास येत आहे. शालेय स्तरापासूनच विद्यार्थ्यांचे प्रबोधन करून मोबाईल फोन व अंमली पदार्थांच्या सेवनापासून त्यांना परावृत्त करण्यासाठी शासनाने उचलेले हे पाऊल कौतुकास्पद आहेत. सहावी ते बारावी पर्यंतच्या सर्व माध्यमिक शाळांमध्ये प्रहारी गटांची स्थापना करणे बंधनकारक असून अंमल बजावणी करावी लागणार आहे.

# आदिवासी बांधवांबाबत शासन प्रशासन संवेदनशील - जिल्हाधिकारी अशोक शिनगारे

ठाणे : ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर गेले १३ दिवस सुरू असलेले श्रमजीवी संघटनेचे आंदोलन आज स्थगित करण्यात आले. ठाणे तालुक्यातील तब्बल ९०५ आदिवासी बांधवांना जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या हस्ते वन हक्क दावे प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

आपल्या वन अधिकारासाठी सलग १३ दिवस आंदोलन करणाऱ्या आदिवासी बांधवांच्या वेदनांची आम्हाला तीव्र जाणीव असून, शासन आणि प्रशासन आदिवासी बांधवांबाबत निश्चितपणे संवेदनशील आहे. काही तांत्रिक बाबींच्या प्रतिक्षेत दावे रखडले,

असे जिल्हाधिकारी शिनगारे यांनी आज येथे सांगितले. तर या आंदोलनादरम्यान आदिवासी बांधवांना त्यांचे न्याय्य हक्क मिळवून देण्यासाठी महसूल, आदिवासी विकास, नगरविकास, वन विभाग, पोलीस असे सर्व शासकीय विभाग तळमळीने काम करीत असल्याचे दिसून आले. असेच एकत्रित काम करणारे शासन जनतेला अभिप्रेत असल्याचे सांगत सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांचे श्रमजीवी संघटनेचे संस्थापक तथा राज्यस्तरीय अनुसूचित क्षेत्र आढावा समिती अध्यक्ष (मंत्री दर्जा) विवेक भाऊ पंडित यांनी भरभरून कौतुक केले.

एकही चुकीचा दावा पात्र नको आणि एकही पात्र होणारा दावा अपात्र होवून कुणावर अन्यायही नको, अशी भूमिका विवेक पंडित यांनी आधीच स्पष्ट केली होती. त्याप्रमाणे पूर्ण तपासणीअंती ९०५ दावेदार पात्र करून त्यांना वन पट्टे वाटप करण्यात आले, काही कागदपत्रांच्या पूर्ततेसाठी ५०१ दावे प्रलंबित ठेवण्यात आले आहेत. त्यांच्या पूर्ततेची पूर्ण संधी आदिवासी वन हक्क दावेदाराला मिळावी, या भूमिकेतून प्रशासन त्या दाव्याबाबत देखील कालबध्द पद्धतीने निपटारा करण्याची सकारात्मक भूमिका घेणार असल्याचे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी स्पष्ट केले.

यावेळी श्रमजीवी संघटना संस्थापक तथा राज्यस्तरीय अनुसूचित क्षेत्र आढावा समिती अध्यक्ष (मंत्री दर्जा) विवेक भाऊ पंडित, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) हरिश्चंद्र पाटील, ठाणे उपविभागीय अधिकारी उर्मिला पाटील, आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी राजेंद्रकुमार हिवाळे, सहायक प्रकल्प अधिकारी तेजस्विनी गलांडे, नायब तहसिलदार राहुल सूर्यवंशी तसेच श्रमजीवी संघटनेचे दत्तात्रेय कोळेकर, बाळाराम भोईर, अशोक सापटे, प्रमोद पवार, राजेश चन्ने, दशरथ भालके, आत्माराम वाघे, नंदा वाघे, बाळू वाघे आदि पदाधिकारी- कार्यकर्ते उपस्थित होते.

# जिल्हाधिकारी कार्यालयात 'स्वच्छता हीच सेवा २०२४' कार्यक्रम संपन्न




ठाणे : राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंती निमित्त आदरांजली म्हणून दि.२ ऑक्टोबर हा दिवस 'स्वच्छ भारत दिवस' म्हणून साजरा केला जातो. त्या निमित्ताने जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या मार्गदर्शना खाली व ठाणे महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने दि.२ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालय येथे 'स्वच्छता हीच सेवा २०२४: स्वभाव स्वच्छता, संस्कार स्वच्छता' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) हरिश्चंद्र पाटील, तहसिलदार (सर्वसाधारण) श्री.संजय भोसले, नगर पालिका प्रशासन जिल्हा सहआयुक्त मारुती गायकवाड, नगरपालिका प्रशासन अधीक्षक भाऊ निपुर्ते, सीएसआय मयुरी वखारिया, अनिल चाचड, अनिल चिपात, फायलेरिया विभागाचे संदीप संख्ये, विविध विभागांचे तसेच स्वच्छता कर्मचारी उपस्थित होते. याप्रसंगी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात साफसफाई करण्यात आली. त्यानंतर उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) हरिश्चंद्र पाटील, नगरपालिका प्रशासन जिल्हा सहआयुक्त मारुती गायकवाड व नगरपालिका प्रशासन अधीक्षक भाऊ निपुर्ते यांनी 'एक झाड आईसाठी' या अभियानांतर्गत जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात वृक्षारोपण केले. तसेच उपस्थित सर्वांनी स्वच्छता शपथ घेतली.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने उपस्थित सर्वांना 'घरच्या घरी जैविक खत कसे तयार करावे', याबाबत प्रात्यक्षिक दाखविण्यात आले.

# राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्लास्टिक मुक्त महाविद्यालय अभियान संपन्न



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता / (प्रतिनिधी) -**

गोवेली : जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष श्री.रविंद्र घोडविंदे सर यांच्या मार्गदर्शनाने जीवनदीप महाविद्यालय गोवेली येथे , राष्ट्रीय सेवा योजना विभागांतर्गत आज दि. ०१/१०/ २०२४ रोजी महात्मा गांधी जयंती निमीत्त स्वच्छता ही सेवा या उपक्रमाअंतर्गत महाविद्यालय परिसरातील प्लास्टिक जमा करून प्लास्टिक मुक्त महाविद्यालय करण्याचे NSS स्वयंसेवकांनी निर्धार व्यक्त केला.

या कार्यक्रमाला आम्हाला जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे संचालक प्रशांत घोडविंदे , प्राचार्य डॉ. के. बी. कोरे , उपप्राचार्य हरेंद्र सोष्टे यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

तसेच या कार्यक्रमाला एनएसएस कार्यक्रम अधिकार प्रा . दिनेश धनगर व अपर्णा जाधव , प्राध्यापक ,कर्मचारी, एन एस एस स्वयंसेवक उपस्थितीत होते.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे तथा कार्यकारी संपादक विजय गोविंद यादव यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९१५८०७८६०१ E Mail – jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी

# स्वामीनारायण मंदिर संस्थेच्या स्वच्छता अभियानाला उदंड प्रतिसाद

## मंत्री रवींद्र चव्हाण, संस्थेचे स्वामी हरिचरण दास महाराज, माजी नगरसेवकांचा सहभाग



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/ (प्रतिनिधी) –**

डोंबिवली : महात्मा गांधी जयंतीनिमित्त डोंबिवली पूर्वेला स्वामी नारायण मंदिर संस्थेच्या माध्यमातून बुधवारी स्वच्छता अभियानाचे अयोजन केले होते. राजाजी पथ येथील स्वामी नारायण मंदिर ते पुढील चौकापर्यन्त त्या उपक्रमाचे आयोजन केले होते, त्यात संस्थेचे स्वामी हरिचरण दास महाराज, सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांची उपस्थिती होती.

त्या दोघांनीही स्वच्छता अभियानाला स्वतः येऊन सुरुवात केल्याने मंदिराचे शेकडो भक्त रस्त्यावर उतरले आणि त्यांनी परिसरातील जोड रस्त्यांची स्वच्छता केली.

दरवर्षी असा उपक्रम होत असून सामाजिक बांधीलकी आणि स्वच्छतेचे महत्व।समाजाला पटवून देण्यासाठी त्या उपक्रमाचे आयोजन केले जात असल्याचे हरिचरण दास म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वच्छता विषयाला प्राधान्य देऊन तिन्ही टर्म मध्ये ते स्वतः या विषयी विविध उपक्रम आयोजित करून स्वतः त्यात सहभागी होतात. आधी केले आणि मग सांगितले ही उक्ती पंतप्रधान मोदींची असून ती अनुकरणीय आहे असे मला वाटत असल्याचे मत मंत्री रवींद्र चव्हाण यांनी व्यक्त केले. स्वच्छता ही एका दिवसाची असून उपयोग नाही तर त्यात सातत्य हवे, त्यातून परिसर स्वच्छता, पर्यावर राखले जावे असेही चव्हाण म्हणाले.

मंत्री चव्हाण हे आताच नव्हे तर गेली अनेक वर्षे या उपक्रमात येतात, झाडू हातात घेतात आणि त्यामुळे त्यांचे सहकारी येतात मदत करतात त्याचा आनंद असल्याचे स्वामी नारायण भक्तांनी सांगितले.

त्या उपक्रमात भाजपचे पूर्व मंडळ अध्यक्ष, ज्येष्ठ माजी नगरसेवक विषु पेडणेकर, दिनेश गौर, मंदार हळबे, अमित कासार यांसह पक्षाचे कार्यकर्ते, नागरीक उपस्थित होते.

# अनिता प्रविण कळसकर यांना राज्यस्तरीय साहित्यरत्न पुरस्कार



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/ (प्रतिनिधी) –**

कल्याण : सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा या क्षेत्रातील कामाची दखल घेऊन कल्याणच्या समाजभूषण प्राप्त कवियित्री मा.अनिता प्रविण कळसकर यांना नुकताच आदर्श रायगड वृत्तपत्र आणि वृत्तवाहिनी कडून राज्यस्तरीय साहित्यरत्न पुरस्काराने अंबरनाथ येथे तृतीय वर्धापन दिनानिमित्त सन्मानित करण्यात आले. शिक्षणक्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या बी.ए.एम.ए.एम.फिल असणा-या अनिता प्रविण कळसकर यांच्या साहित्यिक क्षेत्राततील भरीव कामगिरी बद्दल त्यांचा गौरव करण्यात आला.अनिताताईंनी दोन राज्यस्तरीय काव्य संमेलनाचे आयोजन कल्याण येथे केलेले होते. त्यावेळी महाराष्ट्रातील अनेक नामवंत कलाकारांनी या संमेलनात आपली हजेरी लावली.तसेच आस्वाद ही घेतला .अनिता कळसकर या शब्दसुमने साहित्यिक मंच च्या संस्थापिका आणि अध्यक्षा आहेत.नुकताच त्यांना प्रजासत्ताक अमृत गौरव, महाराष्ट्र राज्य या समितीने समाजभूषण या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. त्यात २९ सप्टेंबर २०२४ ला राज्यस्तरीय साहित्यरत्न या पुरस्काराने गौरविण्यात आले.

अंबरनाथ येथे हा कार्यक्रम उत्साहात पार पडला.याप्रसंगी शिक्षक मतदार संघाचे आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, मुख्य संपादक शैलेश सणस, उपसंपादक अविनाश म्हात्रे ,मराठी वृत्तपत्र लेखक संघाचे अध्यक्ष रवींद्र मालुसरे, नगरसेवक सचिन पाटील तसेच प्रेरणा फाऊंडेशन च्या अध्यक्षा सौ. दिप्ती गावकर कुलकर्णी इ. मान्यवर उपस्थित होते.अनिता प्रविण कळसकर यांना राज्यस्तरीय साहित्यरत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल साहित्यिक क्षेत्रात त्यांच्यावर स्तुतीसुमनांचा वर्षाव होत आहे.

# अनुव्रत समितीच्या जातीय सलोखा दिनाची सांगता

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/ (प्रतिनिधी) –**



मुंबई : मुंबई अनुव्रत उदबोधन सप्ताहांतर्गत पहिला दिवस अनुव्रत समिती, मुंबई क्षेत्र डोंबिवली यांच्या वतीने जातीय सलोखा दिवस म्हणून विविध पंथातील धर्मगुरू व अनुयायी यांच्या उपस्थितीत मुनीश्री कमल कुमार यांच्या उपस्थितीत विविध संप्रदायांचे अनुयायी यांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला. ब्रह्मा कुमारीतील शकू दीदी, बौद्ध धर्माचे सुगंतानंद भिकू, धर्मोपदेशक दिनेश पटेल, स्वामीनारायण पंथाचे हरिचरण, ख्रिश्चन धर्माचे फादर सुधीर वी यांनी आपले सांप्रदायिक विचार मांडले. ज्यामध्ये सर्वांनी एकच गोष्ट सांगितली की आपल्या सर्वांचे ध्येय आत्मा शुद्धी, आपलेपणा आणि बंधुत्वाची भावना असणे आवश्यक आहे.मुनिश्री कमलकुमार आपल्या भाषणात म्हणाले की, माणूस स्वतःच निर्माण करतो आणि स्वतःचा नाश करतो, कोणतेही काम ध्येय ठेवून आणि वेळेत केले.

तर ते यशस्वी होते, सर्वांचे कल्याण होते, सर्व काही चांगले होते. कार्यक्रमाचे स्वागत डोंबिवली अनुव्रत समन्वयक अनिल चंडालिया यांनी केले. सीमा इटोडिया आणि प्रीती सिंघवी यांनी निवेदन केले. अनुविभाचे उपाध्यक्ष विनोद कोठारी यांनी अनुव्रताबद्दल मनोगत व्यक्त केले. अनुविभाचे प्रसिद्धि प्रमुख (माध्यम प्रभारी) महावीर बडाला, मुंबई अनुव्रत समितीचे उपाध्यक्ष चंद्रप्रकाश बोहरा, सुशील हिरण, अरविंद सोनी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुकेश बडाला, विकास मेहता, डॉ. मुनोत, धर्मेश कोठारी तसेच डोंबिवली अनुव्रत येथील सर्व सभा संस्था व सदस्यांचे सहकार्य लाभले. तपावरील निशा इटोडिया या स्व-रचित गाण्यासाठी मुनिश्री यांनी संगीत दिले. साध्वी प्रमुख यांच्या संदेशाचे वाचन जगदीश परमार यांनी केले.

सूत्र संचालन अनुविभाचे सहसचिव मनोज सिंघवी यांनी केले.



हा फोटो आहे एका टोमॅटो च्या रोपाचा , कोणीतरी एखाद्या प्रवासी यात्रेकरूंने टोमॅटोचे बी (बिज) धावत्या रेल्वेतून फेकले असेल हे रोप माती सारुन नाहीतर काळे पाषाण दगड भेदून बाहेर आले आहे, जेंव्हा हे झाड लहान होते. तेंव्हा शताब्दी आणि राजधानी एक्सप्रेस सारख्या भरधाव वेगाने धावणाऱ्या ट्रेन या झाडाच्या अगदी जवळून जात असतील, कर्कश्श आवाज होत असेल. अस्तित्व संपण्याची भिती निर्माण होत असेल परंतु संघर्ष करीत करीत शेवटी त्याने एका टोमॅटोच्या फळाला शेवटी जन्म दिलाच. या झाडाला ना कोणी पाणी दिलं ना माती दिली, ना खत दिलं ना कुणी संगोपन केले, कुठल्याही आधाराशिवाय याने स्वतःला मोठे केले व फुलफळा पर्यंत आणले याच्या आयुष्याचे उद्दिष्ट फक्त एकच होते ते म्हणजे फळ देणे ते उद्दिष्ट याने संघर्ष करून पुर्ण सुध्दा केले.

समाजात काही लोकांना असे वाटते कि आम्ही अपयशी, कुचकामी ठरलो. आम्ही आमच्या जीवनात काहीच करू शकत नाही. आम्ही संपलो बरबाद झालो. त्यांनी या टोमॅटोच्या झाडापासून काहीतरी बोध, शिकवण, प्रेरणा घेतली पाहिजे...!

परिस्थिती कशीही येवो जीवनात हताश, निराश न होता संघर्ष केला पाहिजे...!

# शेई विभाग हायस्कुलच्या मुलींचा कबड्डी संघ जिल्ह्यात अव्वल

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/ (प्रतिनिधी) –**



शहापूर ग्रामिण : ठाणे जिल्हा क्रीडा विभागाच्या वतीने आयोजित केलेल्या तालुका स्तरीय( अंडर १७ वर्ष ) मुलींच्या कबड्डी स्पर्धेत शेई विभाग हायस्कुल शेई च्या संघाने तालुक्यात प्रथम कमांक मिळवून जिल्हा स्पर्धेत शहापूर तालुक्याचे प्रतिनिधित्व केले.

बदलापूर येथील भारत इंजिनिअरिंग कॉलेज या ठिकाणी १ ऑक्टोबर २०२४ रोजी आयोजित केलेल्या जिल्हा कबड्डी स्पर्धेत अनेक तालुक्यातून आलेल्या मातब्बर संघांना नमवून व उत्कृष्ट खेळी करून शेई विभाग हायस्कुल शेईच्या अंडर १७ वर्ष मुलींच्या संघाने जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवून शाळेचे नाव उज्वल केले.याबद्दल सर्वत्र तालुक्यात, जिल्ह्यात, परिसरात, पालकांच्या व सर्व आजी माजी विद्यार्थ्यांच्या वतीने, शालेय समिती, शिक्षक शिकेतर कर्मचारी, व संस्थेच्या वतीने विद्यालयाचे, विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे भरभरून कौतुक व अभिनंदन होत आहे.या स्पर्धेसाठी मार्गदर्शक म्हणून नितीन तारमळे सर व वसंत धनगर सर यांनी मुलींना उत्कृष्ट मार्गदर्शन केले या विद्यालयाचे मुख्याध्यापक आव्हाड सर व सर्व शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी या कामी सहकार्य केले

# गांधी जयंती दिनी आधार फाउंडेशनच्या वतीने रक्तदान शिबीर संपन्न

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/ (प्रतिनिधी) –**




मुरबाड : आधार फाउंडेशन सामाजिक सेवा संस्था मुरबाड प्रत्येक महिन्याला उपक्रम राबवत असते. सामाजिक उपक्रमापैकी रक्तदान शिबिर हे प्रत्येक वर्षी घेत असतात. आज महात्मा गांधी जयंती व लालबहादूर शास्त्री जयंतिचे औचित्य साधून शाळा व्यवस्थापन समिती देवगाव यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा परिषद शाळा देवगाव येथे ५४ रक्तदात्यांनी रक्तदान केले. त्यासाठी संकल्प ब्लड बँक पूर्ण टीम उपस्थित होती. संस्थेने केलेल्या आवाहनाला सर्वांनी प्रतिसाद देऊन रक्तदान केले. त्याचबरोबर संस्थेने असे आवाहन केले आहे की,कोणत्या ही रूग्णाला जर रक्ताची गरज लागल्यास संस्थेकडे निसंकोचपणे मागणी करावी, त्यास तात्काळ रक्त पुरवठा केला जाईल.. या उपक्रमासाठी संस्थेचे सर्व पदाधिकारी, अध्यक्ष कैलास कोर, सचिव नितीन राणे , अनंत विशे ,संजय घुडे , कचरू टेकडे,विलास घरत, अंकुश खारीक, दिनेश भावार्थे, राजेश पाटील , लक्ष्मण भांडे, दत्तात्रय ढमके, पद्माकर कोर,भगवान गायकर, भालचंद्र गोडांबे ,एकनाथ देसले , जयवंत ठाकरे,भुषण कोर,अशोक गोडांबे , प्रकाश राणे, हिरामण राणे, गणेश भोईर,राजेश रांजणे, पद्माकर हरड, प्रफुल कोर,माजी सभापती श्रीकांत धुमाळ,मोहनजी भावार्थे, किसन विशे, गजानन टोहके , गोविंद खाटेघरे, दिलीप कराले, देवगाव ग्रामपंचायतचे सरपंच स्वप्निल तुपे, देवगाव ग्रामस्थ दौलत तुपे,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष रविंद्र केंबारी, हरेश तुपे शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. दीपश्री इसामे उपस्थित होते...

# थायलंड देशातून वेश्या व्यवसायासाठी आणलेल्या मुलींची सुटका

## खंडणी विरोधी पथक, गुन्हे शाखा ठाणे कडून वेश्या व्यवसायाचा पर्दापाश

ठाणे : ठाणे शहर परिसरात थायलंड देशातील महिलांना वेश्यागमनासाठी तयार करून चांगल्या आर्थिक प्राप्तीचे अमिष दाखवून प्रदेशातून बोलावून घेऊन त्यांच्याकडून सितारा लॉजिंग अँड बोर्डिंग, सेक्शन १७, उल्हासनगर-३ येथे वेश्याव्यवसाय करून घेतला जात असल्याची माहिती मिळताच खंडणी विरोधी पथकाचे प्रभारी अधिकारी शोध-१, गुन्हे शाखा, ठाणे शहरचे सहाय्यक पोलीस आयुक्त शेखर बागडे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक नरेश पवार व पथकाने दिनांक ०२ ऑक्टोबर २०२४ रोजी सितारा लॉजिंग अँड बोर्डिंग, सेक्शन १७, उल्हासनगर -३ येथे बनावट ग्राहक पाठवून छापा घातला. त्यावेळी लॉजमध्ये मॅनेजर कुलदीप उर्फ पंकज जयराम सिंग सह ४ कामगार यांना ताब्यात घेऊन १५ बळीत महिलांची सुटका करण्यात आले आहे. सदर कारवाई दरम्यान लॉजमधून पाच लाख सत्ताविस हजार रोख रक्कम व साधने जप्त करण्यात आले आहेत. सदर लॉजिंग व बोर्डिंगचे मॅनेजर व तेथे काम करणारे चार कामगार यांचे विरुद्ध मध्यवर्ती पोलीस स्टेशन येथे अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कारवाई ठाणे शहर पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, पोलीस सह आयुक्त ज्ञानेश्वर चव्हाण, अप्पर पोलीस आयुक्त




(गुन्हे) पंजाबराव उगले, पोलीस उपायुक्त (गुन्हे ) शिवराज पाटील, सहायक पोलीस आयुक्त राजकुमार डोंगरे, प्रभारी अधिकारी खंडणी विरोधी पथक तथा सहायक पोलीस आयुक्त शेखर बागडे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक नरेश पवार, सह पोलीस निरीक्षक सुनील तारमळे, पोलीस उपनिरीक्षक विजयकुमार राठोड, पोलीस उपनिरीक्षक सुभाष तावडे, पोलीस हवालदार संजय राठोड, सचिन शिंपी, शितल पावसकर, भगवान हिवरे, तानाजी पाटील, अरविंद शेजवळ यांचे पथकाने केली आहे.

